आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२४ जून २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शक्तिपीठ महामार्गाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी, प्रकल्प आखणी आणि भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद /आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या भत्त्यांमधे वाढ

- शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १ हजार ७१ मेगावॅट क्षमतेचे सौरउर्जा प्रकल्प उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- संसदेच्या अंदाज समितीच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप

- राज्य शासनाचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**आणि**

- भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं निधन

**<><><><>**

शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला राज्य मंत्रिमडळानं आज मान्यता दिली. त्याबरोबरच प्रकल्प आखणी आणि भूसंपादनासाठी २० हजार ७८७ कोटी रुपयांच्या तरतुदीलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. या मार्गामुळे राज्याच्या पुर्वेकडे वर्ध्यातल्या पवनार पासून पश्चिमेकडे सिंधुदुर्गातल्या पत्रादेवी ही महाराष्ट्र-गोवा सीमा जोडली जाणार आहे.

आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता तसंच आहार भत्त्यात वाढ करायचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. याअंतर्गत महागाई निर्देशांकाचा विचार करून सरकारनं सुधारीत भत्ते निश्चित केले आहेत.

२०१७च्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमात, केंद्र सरकारनं केलेल्या बदलांच्या अनुषंगानं सुधारणा करून, आगामी अधिवेशनात नवं विधेयक आणण्याचा निर्णयदेखील आजच्या बैठकीत झाला.

सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती अथवा विलंब शुल्काच्या थकबाकीविषयक तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आगामी अधिवेशनात मांडण्याच्या निर्णयाला मान्यता दिली गेली. यामुळं जुनी वसुलीची प्रलंबित प्रकरणं तडजोड रक्कम भरून बंद होतील आणि शासनाचा थकित असलेला महसूलही वसूल करणं शक्य होईल.

याशिवाय वांद्रे पूर्व मधल्या उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरच्या विस्थापितांना शुल्कमाफी, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात मौजे चिखली मधल्या दफनभूमीच्या एकूण क्षेत्रापैकी ४० टक्के क्षेत्र मैला शुध्दीकरण केंद्रासाठी वापरणं, महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या २ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला शासकीय हमी देण्याचा आणि त्यापोटीचं हमी शुल्क माफ करण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला.

**<><><><>**

राज्यात शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १ हजार ७१ मेगावॅट क्षमतेचे सौरउर्जा प्रकल्प ‘मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०’ अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. या प्रकल्पांमुळे राज्यातल्या ३ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी ५ दशांश मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ ते १० किलोमीटर परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जाणार आहेत. हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

**<><><><>**

केंद्र आणि राज्य सरकारकडून कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च वाढत असल्याने संसद आणि विधिमंडळाच्या अंदाज समित्यांची जबाबदारी वाढली असून या समित्यांनी अधिक कार्यक्षमतेनं जबाबदारीचं पालन करावं असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते आज मुंबईत विधानभवनात संसदेच्या अंदाज समितीच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात बोलत होते.

देशावरच्या कर्जाचा भार पाहता जन कल्याणासाठी अधिक खबरदारीनं खर्च करण्याची गरज आहे. त्यात या समित्यांची भूमिका महत्वाची असल्याचं ते म्हणाले.

संसदीय समित्या सरकारच्या विरोधी नव्हे तर पूरक काम करतात. त्यांच्या अहवालाकडे पाहताना सरकारनं हाच दृष्टिकोन ठेवावा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या समित्यांचे अहवाल योग्यरितीनं अंमलात आणावेत अशी सूचना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी केली..

**Hold - Byte**

संसदीय समित्यांनी योग्य रीतीनं समीक्षा केली तर अनेक बदल घडू शकतील. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन त्याचा तसंच data analysis चा वापर करून अधिक चांगलं काम करता येईल, असंही ते म्हणाले.

सुशासनासाठी विचारपूर्वक खर्चाची गरज असते यावर परिषदेत चर्चा झाल्याचं राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. संसदेच्या अंदाज समितीचे अध्यक्ष संजय जयस्वाल यांनी या परिषदेत झालेल्या कामकाजाचा आढावा घेतला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधान सभाअध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

राज्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाच्या जोरदार सरी येत आहेत. राजधानी मुंबईत आकाश काळ्या ढगांनी दाटून आलं आहे, सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाच्या तुरळक सरी येत आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात जगबुडी नदीनं पुन्हा एकदा इशारा पतळी ओलांडली आहे.

**सातारा** जिल्ह्यात कण्हेर आणि उरमोडी धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरु असून दुपारपासून पाण्याचा विसर्ग वाढवला आहे.

**नाशिकमधे** पाऊस ओसरल्यानं गंगापूर धरणातला विसर्ग कमी केला आहे. दारणा धरणातून होणारा विसर्ग वाढवून ४ हजार १७२ क्युसेक इतका केला आहे.

**<><><><>**

पत्रकारितेच्या क्षेत्रातल्या उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्या वतीनं दिले जाणारे २०२१ ते २०२३ या तीन वर्षांसाठीचे पुरस्कार जाहीर झाले आहे. यामध्ये पाच ज्येष्ठ

पत्रकारांना लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. राही भिडे, सुधीर पाठक, भाऊ तोरसेकर, विजय बाविस्कर आणि बाळासाहेब जाधव या पुरस्काराचे मानकरी आहेत. एक लाख रुपये, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सन २०२१ सालचा अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार मंगेश वैशंपायन यांना मिळाला आहे. १ लाख रुपये, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

याखेरीज इतर विविध प्रकारांमधे दिले जाणारे पुरस्कारही जाहीर झाले असून ५१ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

<><><><>

२०४७ पर्यंत भारत विकसित भारतासाठी नवोन्मेष हा एक प्रमुख कणा असून त्यासाठी धोरण, संशोधन, आणि उद्योग यांना जोडण्यात आय़आय़एम मुंबईची महत्त्वाची भूमिका असल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान, पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी आज म्हटलं आहे. आयआयएम मुंबई इथं आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. आयआयएम मुंबईनं इनक्यूबेशन फाउंडेशन फॉर इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्योरशिपच्या उद्घाटनासह एक महत्त्वाचा टप्पा गाठला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं काल रात्री लंडन इथे हृदयविकारामुळे निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आठशे अठ्ठ्याण्णव बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी २३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४३ वेळा ५ बळी घेतले. एका सामन्यात दहा बळी घेण्याचा विक्रम त्यांनी सहा वेळा केला होता. दोशी यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये तसंच परदेशी कौंटी क्रिकेटमध्येही आपलं कौशल्य दाखवलं होतं. भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं दोशी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या अँडरसन - तेंडुलकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, आज पाचव्या आणि अखेरच्या दिवशी इंग्लंडनं विजयी लक्ष्याच्या दिशेनं दमदार वाटचाल सुरू केली आहे.

या सामन्यात भारतानं इंग्लंडसमोर विजयासाठी ३७१ धावांचं आव्हान ठेवलं होतं. आज अखेरच्या दिवशी इंग्लडनं दुसऱ्या डावात बिनबाद २१ धावांवरून या लक्ष्याचा पाठलाग सुरू केला. आजच्या खेळात दुसऱ्या सत्रापर्यंत इंग्लंडनं भारताच्या गोलंदाजांना एकही बळी मिळू न देता, पावणेदोनशे धावांचा टप्पाही ओलांडला होता.

इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेट यानं शतकी खेळी केली तर झॅक यानं त्याला चांगली साथ देत अर्धशतक झळकावलं.

पावसामुळे खेळ थांबला तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात बिन बाद १८१ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

पुढचे दोन दिवस पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि नंदूरबार जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसंच नाशिक आणि पुणे घाटमाथ्यावर अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून हवामान विभागानं रेड अलर्ट जारी केला आहे. तर कोल्हापूर आणि सातारा घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><>//**